# विधानसभा निवडणूक 2019 व पक्षीय संदर्भ

श्री. केतन दत्तू लाटे, संशोधक विद्यार्थी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

.................................................................................................................................................................

प्रस्थावना:—पुरोगामी महाराष्ट्रातील १३ व्या विधानसभेसाठीची निवडणूक खऱ्या अर्थाने वेगळी आणि अनेकांना आत्मपरीक्षण करायला लावणारी ठरली. ऐन निवडणुकीच्या तोंडावर मोठ्या प्रमाणात पक्षांतर व बंडखोरीमुळे निवडणुकीने आपल्या वेगळेपणाची नोंद महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात केली. हि निवडणूक प्रामुख्याने भाजपा–शिवसेना युती आणि कॉंग्रेस– राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडी यांच्यात लढवली गेली. इतर राजकिय पक्षांचा निवडणुकीत सहभाग असला तरी निकालांमध्ये त्यांचे अस्तित्व फारसे दिसून येत नाही.
या निकालांवरून असे स्पष्ट दिसून येते कि, राष्ट्रीय स्तरावरील मुद्यांना राज्यांच्या निवडणुकांतील वापर फारसा प्रभावी ठरत नाही. राष्ट्रवाद व राष्ट्रीय अस्मिता या आभासी मुद्यांना नाकारून जनतेने आम्ही सजग आहोत  व आम्हाला कोणीही गृहीत धरू नये असा इशाराच यानिवडणूक निकालातून सर्व राजकीय पक्षांना दिल्याचे दिसून येते.

सहभागी पक्ष व त्यांची कामगिरी:—विधानसभा निवडणुकीत प्रमुख राष्ट्रीय तसेच स्थानिक राजकीय पक्षांनी सहभाग नोंदवला असला तरी निकालांमध्ये मोजकेच पक्ष प्रभावी ठरल्याचे दिसून येते. भाजपा–शिवसेना युती आणि कॉंग्रेस– राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडी यांनी इतर पक्षांचे अस्थित्व झाकोळून टाकल्याचे दिसते. या निवडणुकीतून पक्षीय विचारसरणी, पक्षनिष्टा, वैचारिक व तात्विक राजकारण याला सर्वच पक्षांनी बाजूला सारल्याचे दिसून येते.

भाजपा हा या निवडणुकीत सर्वाधिक जागा मिळवणारा पक्ष म्हणून समोर आला. २०१४ च्या निवडणुकीपेक्षा त्यांच्या जागा कमी दिसत असल्या तरी त्यांची एकंदर कामगिरी आणि  विजयाची टक्केवारी जास्त आहे. या वेळेस त्यांनी लढवलेल्या १६५ जागांपैकी १०२ जागा म्हणजे जवळपास २६३ जागा जिंकल्या आहेत. तर त्यांच्या मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेने १२४ पैकी ५६ जागा जिंकल्या आहेत. एकंदर कामगिरीत भाजपा कोकण विभाग वगळता राज्याच्या सर्व भागात वरचढ ठरली आल्याचे दिसून येते. १६६० नंतर सलग दुसर्यांदा १०० जागांचा टप्पा गाठण्याची कोणत्याही पक्षाला न जमलेली कामगिरी भाजपाने करून दाखवली असली तरी सत्ताधरी पक्षातील ८ मंत्री व अनेक मात्तब्बर नेत्यांचा पराभव असे धक्कादायक निकालही लागले आहेत.दुसऱ्या बाजूला मोठ्या प्रमाणात पक्षांतराने ग्रासलेल्या कॉंग्रेस–राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडीने ६८ जागा मिळवत आपले आव्हान जिवंत ठेवले. जनतेने भाजप–शिवसेना युतीला स्पष्ट जनादेश दिला असला तरी आघाडीच्या रूपाने प्रबळ विरोधी पक्ष निर्माण करून लोकशाही पूरक  आशादायी वातावरण तयार केल्याचे दिसून आले. प्रस्थापित पक्षांसमोर वंचित बहुजन आघाडीकडून समर्थ पर्याय उभा करण्याचा प्रयत्न करण्यात आला असला तरी हा प्रयोग फसल्याचे दिसून येते. त्याच बरोबर बहुजन विकास आघाडीला तीन व मनसे या पक्षाला केवळ एका जागेवर समाधान मानावे लागले. तसेच इतर पक्ष व अपक्षांनी मिळून २८ जागांवर विजय मिळवला. निवडणुकीच्या तोंडावर सत्ताधारी पक्षात प्रवेश करणाऱ्या अनेक मातब्बरांना जनतेने नाकारले व आयात उमेदवारांचा जीवावर विजय प्राप्त होईल असा अतिआत्मविश्वास बाळगणाऱ्या पक्ष नेतृत्वाला अंतर्मुख होण्यास भाग पाडले. या निवडणुकीत सर्व पक्षांतून एकूण २४ महिला विजयी झाल्या हे प्रमाण २०१४ च्या तुलनेत अधिक असले तरी यामुळे लोकशाहीतील महिलांच्या सहभागावर प्रश्नचिन्ह उभे रहाते.

पक्षांतर्गत नेतृत्व बदल:—२०१४च्या निवडणुकीच्या तुलनेत सर्वच प्रमुख राजकीय पक्षांच्या नेतृत्वामध्ये महत्वपूर्ण बदल झाल्याचे दिसून येते. मा.देवेंद्र फडनवीस यांनी गेल्या ५ वर्षात पक्षांतर्गत विरोध संपवून भाजपामध्ये राज्यस्तरावर आपले एकमेव नेतृत्व विकसित केले, तसेचकेंद्रीय नेतृत्व आणि राज्यस्तर यांमध्ये एकमेव माध्यम राहील याची काळजी घेतली.शिवसेना पक्षाचे नेतृत्व पक्षप्रमुख मा.उद्धव ठाकरे आणि त्यांचे चिरंजीव आदित्य ठाकरे यांनी केले.लोकसभा निवडणुकीतील पराभव आनि अनेक आमदार आणि नेत्यांनी पक्ष सोडल्यामुळे कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातील कार्यकर्ते आणि नेतृत्व दोन्हीमध्ये मरगळ आली होती. परंतु राष्ट्रवादीचे पक्षाध्यक्ष मा. शरद पवार यांनी सर्व सूत्रे हातात घेत झंजावती दौरे करत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला उर्जितावस्था प्राप्त करून दिली तर दुसरीकडे कॉंग्रेस पक्षाचे राज्यस्तरीय नेतृत्व मात्र परिस्थितीचे आकलन करण्यात अपयशी ठरले आणि कॉंग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाने तर निवडणुकीकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून आले.

१३ व्या निवडणुकीच्या निमित्ताने भाजपा वगळता इतर प्रमुख राजकीय पक्षांमध्ये तरुण नेतृत्वाचा उदय झाला. आदित्य ठाकरे ( शिवसेना ), रोहित पवार (राष्ट्रवादी कॉंग्रेस ), धीरज देशमुख व ऋतुराज पाटील (कॉंग्रेस) यांनी विधीमंडळीय राजकारणात प्रवेश केला. राजकीय घराण्यांचा वारसा असला तरी त्यांनी निवडणुकांतून स्वताला सिध्द केल्याचे दिसून आले. या सर्वांचा शहरी तसेच ग्रामीण दोन्ही भागात प्रभाव असल्याचे दिसून येते. भविष्यातील राजारणात हे चेहरे महत्वपूर्ण भूमिका बजावतील यात शंका नाही. त्याच बरोबर निवडणुकीच्या निमित्ताने महाराष्टातील राजकारणात ओबीसी समाजाचे नवीन नेतृत्व उदयास आल्याचे दिसते. डॉ.अमोल कोल्हे, अमोल मिटकरी, धनंजय मुंडे यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या यशात महत्वपूर्ण भूमिका बजावली. यांच्या तुलनेत भाजपामध्ये तरुण नेतृत्वाची कमतरता जाणवते ज्यामुळे भविष्यात त्यांच्यापुढे आव्हान निर्माण होऊ शकते.

नवीन प्रारूपांचा उदय:—निवडणुकीच्या निमित्ताने शरद पवार यांच्या नेतृत्वाचे प्रारूप पुन्हा प्रस्थापित झाल्याचे दिसून आले. शरद पवार यांनी आपल्या वयाचा विचार न करता घेतलेल्या अथक परिश्रमामुळे अनेक पडझडीनंतरही त्यांनीपक्ष जिवंत ठेवल्याचे दिसून आले. शरद पवार यांच्या नेतृत्वास प्रामुख्याने तरुणवर्गाचा पाठींबा मिळाला व त्यांना प्रसार माध्यमांचीही साथ मिळाली. दुसरीकडे भाजपा अंतर्गत देवेंद्र फडणवीस यांचे प्रारूप विकसित झाल्याचे दिसून येते. राज्यातील जिल्हास्तरावरील नेतृत्वाला सोबत घेऊन फडणवीस यांनी केंद्र व राज्य यांच्यातील दुवा म्हणून कार्य केले. व विधानसभा निवडणुकीचे कुशल नेतृत्व केले. हि निवडणूक प्रामुख्याने या दोन प्ररुपांतील लढाई असल्याचे दिसून आले. या निवडणुकीत शिवसेना या पक्षाने सत्ताधारक व विरोधक या दोन्ही भूमिका पार पाडत एका नवीन प्रारूप विकसित केले. २०१४ च्या निवडणुकी नंतर भाजपा सोबत राज्यात युती करत ते सत्तेत सहभागी झाले तर वेळप्रसंगी सरकारच्या निर्णयांना वेळोवेळी विरोध करत विरोधकाची कमतरता देखील भरून काढली. २०१९ च्या निवडणुकीत युती असूनही काही ठिकाणी भाजपच्या विरोधी भूमिका त्यांनी घेतल्याचे दिसून आले.

निवडणूक निकाल विश्लेषण

पक्षीय पातळीवर विचार करता हा निकाल सर्वच पक्षांच्य दृष्टीने सकारात्मक असल्याचे दिसून येते. भाजप च्या दृष्टीने २०१४ पेक्षा जागा कमी झाल्या असल्यातरी एकूण निकालाचे प्रमाण वाढले. शिवसेना पक्षाने ५६ जागा जिंकून सत्ता स्थापनेतील आपले महत्व कायम राखले. राष्ट्रवादी कॉंग्रेसपक्षाने ५४ जागा जिंकून मरगळ झटकत नवी उभारी घेतली आणि शक्तिहीन कॉंग्रेस पक्षाला या निवडणुकीत ४४ जागा अपेक्षित नसलेले यश मिळाल्याने उर्जितावस्था प्राप्त झाली. भाजपा–शिवसेना युतीला जनतेने स्पष्टबहुमत दिले असले तरी कॉंग्रेस–राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडीला समाधानकारक जागा देऊन सक्षम विरोधी पक्ष म्हणून कार्य करण्याची संधी प्राप्त करून दिली आहे.

निष्कर्ष

•कोणताही राजकीय पक्ष हा विशिष्ट सिद्धांत, विचारसरणी वर आधारित असतो. तसेच तो निवडणुकांत जनतेचे प्रतिनिधित्व करत असतात त्यांनी जनतेच्या समस्यांना डोळ्यासमोर ठेऊन कार्य करणे अपेक्षित असते.परंतु २०१९ च्या निवडणुकीत सर्वच पक्षांच्या कार्यपद्धतीत विचारसरणीचा अभाव दिसून आला.

•शेतीच्यासमस्या, शेतकरीमृत्यू, मंदीतील बेरोजगारी प्रमुख विषयांना बगल देवून विकासाच्या मुद्द्यांपासून मतदारांना बाजूला नेण्याचा प्रयत्न करण्यात आला.स्थानिक निवडणुका राष्ट्रीय मुद्द्यांवर जिंकता येत नाहीत हे पुन्हा एकदा सिध्द झाले.

•पक्षाबाहेरील लोक घेऊन पक्ष वाढवता येत नाहीतर त्यासाठी संघटनात्मक पातळीवर प्रयत्न करावे लागतात.

•महिलाप्रतिनिधींचेप्रमाण (२८८पैकी२४ इतके) कमी असल्याने त्या संदर्भात अधिक प्रयत्न करणे गरजेचे आहे.

•प्रादेशिक पक्षांचे भारतातील स्थान कमी होत आहे अशी भीती व्यक्त होत असताना महाराष्ट्रात या निकालांनी हि भीती खोटी ठरवली.

संदर्भ:

१. Election Commission of India official Website-

२. Political and Research Analysis Bureau-

३. bbc-com महाराष्ट्रातील निकाल म्हणजे मोदी मोडेल वर लागलेला अंकुश विश्लेषण.

४.राज्याच्या राजकारणाची नवीन रूपरेषा संपादकीय डॉ. प्रकाश पवार.